# क्विक हिलतर्फे दुर्गम भागासाठी रुग्णवाहिका




पुणे : ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुधारण्याकरिता क्विक हील फाउंडेशन या क्विक हील टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने वाशिममधील अधिकाऱ्यांना दोन अत्याधुनिक वाहने 'आरोग्य यान' सुपूर्द केली. हा समारंभ क्विक हील फाउंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर, वाशिमचे जिल्हाधिकारी षण्मुगराजन एस, वाशिमचे जिल्हा परिषद सीईओ वासुमना पंत, सहाय्यक जिल्हाधिकारी कुलदीप जंगम आणि क्विक हील फाउंडेशनचे व्यवस्थापक अजय शिर्के यांच्या उपस्थितीत झाला. या उपक्रमासह, क्विक हील फाउंडेशनने मनोरा व रिसोड तालुक्यातील एक लाखाहून अधिक लोकांसाठी आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करून त्याचे सकारात्मक परिणाम साधण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे.

सुधारणेची मोठी गरज असलेल्या वाशिम जिल्ह्यातील दुर्गम भागात रुग्णालयात नेण्यासाठी योग्य रुग्णवाहिका नसल्यामुळे रुग्ण जीप किंवा रिक्षासारख्या खासगी वाहतुकीचा पर्याय निवडतात. क्विक हीलचे 'आरोग्य यान' वाशिममधील डॉक्टर आणि रुग्णांच्या दुर्गम भागातून रुग्णांची वाहतूक आणि नियमित तपासणी, निदान व उपचार यांसारख्या आरोग्य सेवा पुरवेल.